Dt.19th May 2026

**National Health Mission**
**State Health Systems Resource Centre, Maharashtra (SHSRC),**
**SHSRC,Maharashtra invites applications from eligible candidates for filling up the following posts**
**(On contractual basis in Maharashtra State as indicated below.)**
**Link for the filling online Google form - https://forms.gle/ea3EmjH9miTx7D5o6**

| Sr. No | Name of Cadre | Place of Posting | Age | Category & No. of Posts | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Executive Director** | SHSRC Pune | Upto 69 years | OPEN-1 | MBBS with Post Graduate Medical or Public Health Qualification or MBA from an institution of repute with specialization in Health Management / Public Health Management / master's in social & other Sciences / Public Policy / Public Administration | with a minimum of 20-25 years of post-qualification work experience of which at least 10 years is in an area of public health or health systems strengthening, in a leadership position. | 100000 |
| 2 | **Advisor** (Public Health) | SHSRC Pune | Upto 69 years | OPEN-1 | Post Graduate or higher qualification in Medicine and Public Health | Minimum 15 years of post-qualification work experience in leading large-scale programmes in the field of Public Health. | 70000 |
| 3 | **Senior Consultant** (Health Care Technology ) | SHSRC Pune | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | OPEN-1 | A Medical Graduate (MBBS), Dental Graduate (BDS), AYUSH Graduate and BSc Nursing with Post Graduate Degree / Diploma in Preventive and Social Medicine, Public Health, Community Health or Community Nursing. OR BE/M.Tech in Biomedical Engineering OR Post Graduate Degree in Biotechnology<br><br>Preference will be given to Biomedical Engineer/ Biotechnology | • At least 5 years of post-qualification work experience in health systems strengthening, program planning or implementation.<br>•Preference will be given to domain specific experience | 55000 (Additional Rs. 5000 for MBBS) |
| 4 | **Consultant** -Public Health | SHSRC Pune | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | SC-1<br>VJ(A)-1<br>OBC-1<br>OPEN-1<br>**Total-4** | A Medical Graduate (MBBS), Dental Graduate (BDS), AYUSH Graduate and BSc Nursing with Post Graduate Degree / Diploma in Preventive and Social Medicine, Public Health, Community Health or Community Nursing. | • A minimum of 2 (Two) years post qualification experience is essential for Medical Graduates (MBBS) and a minimum of 3 (Three) years post qualification experience is essential for non – MBBS (BDS, AYUSH & BSc Nursing) graduates in Public Health or in Planning and Implementation of service delivery.<br>•Preference will be given to domain specific ((Research & Documentation), (Community Processes (CP) and Comprehensive Primary Health Care (CPHC),( Health Economics & Finance), Quality & Public Health) experience | 45000 (Additional Rs. 5000 for MBBS) |
| 5 | **Consultant** ( HR & Policy ) | SHSRC Pune | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | OPEN-1 | A Medical Graduate (MBBS), Dental Graduate (BDS), AYUSH Graduate and BSc Nursing with Post Graduate Degree / Diploma in Preventive and Social Medicine, Public Health, Community Health or Community Nursing **OR** MBA HR<br><br>Preference will be given to MBA HR | A minimum of 2 (Two) years post qualification experience is essential for Medical Graduates (MBBS) and a minimum of 3 (Three) years post qualification experience is essential for non – MBBS (BDS, AYUSH & BSc Nursing) graduates in Public Health or in Planning and Implementation of service delivery.<br>•Preference will be given to domain specific experience | 45000 (Additional Rs. 5000 for MBBS) |
| 6 | Statistician | SHSRC Pune | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | OPEN-1 | MSc. Statistics | Preference will be given to experienced Candidate | 30000 |
| | | | **Total** | **9** | | | |

SD/-
**Joint Director (Non Technical)**
**National Health Mission,Mumbai**

# राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,पुणे, महाराष्ट्र, अंतर्गत रिक्त पदे भरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,पुणे, महाराष्ट्र, अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात https://nhm.maharashtra.gov.in/en/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना/माहिती पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत. खालील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवाराची पात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या पदाकरीता पात्र आहे असा होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी व/वा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**क) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचना –**

१) सर्व उमेदवारांनी जाहिरातीत नमूद **गुगल लिंकवर** ऑनलाईन गुगल फॉर्ममध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.
(**गुगल लिंक** – https://forms.gle/Ao83qexmjVYnDQfB7 )

२) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचूक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) गुगल फॉर्म परीपुर्ण भरल्यावर त्याची प्रिंट काढावी.

४) वरील अर्जाची प्रिंट स्वाक्षरी करून आवश्यक धनाकर्षासह(Demand Draft), मुद्दा (ट) मधील क्र.९ मध्ये नमूद पत्त्यावर विहित कालमर्यादेत सादर करावा. दिलेल्या कालावधीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपालाने/कुरीयरने पाठविलेले अर्ज या कार्यालयास उशीरा प्राप्त झाल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५) अर्जासोबत अनावश्यक कागदपत्र जोडु नयेत.

६) अर्जदाराने प्रत्यक्ष भरलेल्या गुगल फॉर्मची प्रत व त्यासह आवश्यक स्वसाक्षांकित प्रमाणपत्र/कागदपत्र जोडलेली नसल्यास असा अर्ज अपूर्ण समजण्यात येऊन तो रद्द करण्यात येईल.

७) उमेदवाराने एका पदाकरीता एकच गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे.

८) उमेदवार एका पेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करू शकतो. तथापि, प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र गुगल फॉर्म भरणे आवश्यक असून वरील निर्देशांप्रमाणे तो या कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे. प्रत्येक पदाकरीता अर्ज शुल्काचा स्वतंत्र धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.

**ख) वयोमर्यादा -**

१) गुगल अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि.०९ जून २०२६ रोजी उमेदवाराचे वय प्रत्येक पदाकरीता जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२) जाहिरातीमध्ये नमूद अ.क्र.१ व २ वरील पदांकरिता (Executive Director & Advisor (Public Health) अर्ज करणा-या उमेदवारांकरिता वयोमर्यादा ६९ वर्ष राहील. तसेच उर्वरित पदांकरिता, अराखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील.

३) राष्ट्रीय आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कमाल वयोमर्यादा लागू राहणार नाही. तथापि, अर्जासोबत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या प्रमुखांचे तशा आशयाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

**ग) अर्ज भरण्याबाबतच्या सुचना -**

१) सर्वप्रथम ज्या पदाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव ड्रॉप बॉक्स (DROP BOX) मधून निवडावे.

२) उमेदवाराने स्वतःचे पूर्ण नाव अचूकपणे नोंदवावे.

३) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.

४) गुगल फॉर्म सादर करण्याच्या अंतिम तारखेस (दि.०९ जून २०२६) असणारे वय (वर्ष, महिने व दिवस) अर्जात अचूक नमुद करावे.

५) अर्जात सर्व माहिती अचूक नमूद करावी.

६) अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःचा वैध ईमेल आयडी/पर्यायी ईमेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. (आवश्यकतेनुसार पात्र/अपात्र यादीमधील मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखती संदर्भात देण्यात येणा-या सुचना ईमेलव्दारे देण्यात येतील तसेच पात्र उमेदवारांपैकी मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे ईमेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहतील व ईमेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. **तसेच पदभरती बाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि**

**पदभरती बाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी या कार्यालयाच्या (https://nhm.maharashtra.gov.in/en/) संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याकरिता वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे देखील बंधनकारक आहे.)**

७) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे. असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

८) उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा. उमेदवार राखीव प्रवर्गात मोडत असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे. राखीव प्रवर्गाच्या उमेदवाराने जात प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारास अराखीव प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल व त्याला आरक्षणाचा व त्याअनुषंगाने उपलब्ध इतर लाभांचा फायदा घेता येणार नाही.

९) इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक,सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग या प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांनी चालू वर्षाचे आवश्यक नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील. अथवा अशा उमेदवारास अराखीव प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल

१०) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता गुगल फॉर्ममध्ये अचूक नमूद करावा.

**घ) शैक्षणिक अर्हता/पात्रता –**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२) गुगल अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

३) आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. (निकाल घोषीत केल्याचा दिनांक)

४) अर्ज भरत असताना मिळालेल्या गुणांची टक्केवारी (Aggregate percentage) अचूकपणे नमूद करावी.**फक्त ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे आवश्यक आहे**.

५) शैक्षणिक प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

६) अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्र/कागदपत्र अर्जासोबत जोडून सादर करणे अनिवार्य राहील. अर्जाच्या छाननी दरम्यान आवश्यक शैक्षणिक

अर्हतेच्या गुणपत्रिका न जोडल्यास व गुगल फॉर्म मध्ये नमूद केलेली माहिती न जुळल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

७) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही "विद्यापीठ अनुदान आयोग" मान्यताप्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे. इतर विद्यापीठातून घेतलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता ग्राह्य धरण्यात येणार नाही.

८) ज्या वैद्यकीय पदांकरिता संबंधित वैद्यकीय परिषदेची नोंदणी अनिवार्य आहे. अशा अर्जदारांनी संबंधित परिषदेकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र व नूतनीकरण प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

९) गुगल अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१०) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**ड) अनुभव –**

१) अर्ज करीत असलेल्या पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.

२) अनुभवाचा तपशील नमूद करताना पहिली नियुक्ती कालावधी ते सध्याची नियुक्ती कालावधी या क्रमानेच द्यावा.

३) अर्जाची हार्ड कॉपी सादर करताना अनुभव प्रमाणपत्र देखील सादर करावे. प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

४) अनुभवाचा तपशील नमूद करताना रूजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. दोनही तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास अशा अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही.

५) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही. अनुभवासंदर्भात पात्रतेचा अंतिम निर्णय निवड समितीचा राहील.

**च) संगणक अर्हता व इतर –**

१) MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा त्याबाबतचा तपशील नमूद करावा.

**छ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र –**

१) शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.

२) उमेदवाराने या अनुषंगाने प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) सदर लहान कुटुंबाचे प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

**ज) अर्ज शुल्क -**

१) उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.७५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.५००/- रकमेचा बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्ज शुल्क असेल. धनाकर्ष पुढील नावे काढावा.

**STATE HEALTH SOCIETY MAHARASHTRA - OTHERS**

२) योग्य धनाकर्षाशिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करीत असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र धनाकर्ष जोडावा.

४) अर्ज शुल्क ना परतावा (Non Refundable) आहे.

**झ) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी-**

१) उमेदवाराने गुगल फॉर्मची प्रिंट काढल्यावर फोटो करीता राखील जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२) स्वाक्षरीकरीता राखील जागेत स्वाक्षरी करावी.

**ञ) निवड प्रक्रिया -**

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया केवळ मुलाखतीद्वारे अथवा लेखी व मुलाखतीव्दारे घेण्यात येईल.

२) निवड जर मुलाखतीद्वारे घेण्यात येणार असल्यास त्यावेळी प्राप्त होणा-या अर्जांच्या संख्येनुसार व गुण तसेच अनुभव या आधारे १:५ प्रमाणे उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३) उपरोक्त निवड प्रक्रियेसंदर्भात मुद्दा क्र.१ नुसार आवश्यकतेनुसार प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांचेकडे राहतील, त्यामुळे उपरोक्त नमूद निवड प्रक्रियेत परिस्थिती अनुरूप बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ट) सर्वसाधारण सुचना-**

१. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या website वर दिलेल्या गुगल लिंक वर ऑनलाईन अर्ज केल्यानंतर त्याचीच प्रत सादर करणे आवश्यक आहे.

२. सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी https://nhm.maharashtra.gov.in/en/ या संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

३. जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त कंत्राटी पदांच्या संख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्यशासनाची नियमित पदे नाहीत.

५. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

६. सेवानिवृत्त कर्मचा-यांकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे प्रचलित नियम लागू राहतील.

७. सदरील पदांकरीता अर्ज केलेल्या व नियुक्तीस पात्र ठरलेल्या उमेदवार राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे येथे पदस्थापनेकरीता पात्र राहतील.

८. गुगल फॉर्म भरण्यांची अंतिम तारीख **दि.०९ जून २०२६** रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत असेल.

९. गुगल फॉर्म पुर्ण भरल्यावर त्यांची प्रिंट काढावी. सदर प्रिंटसोबत आवश्यक धनाकर्षासह (Demand Draft) जोडून अर्ज पुढील पत्त्यावर **दि.१६ जून २०२६** पुर्वी पोहोचेल अशा रीतीने हस्तदेय सादर करावा किंवा टपालाने/कुरीयरने कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत मिळेल अशा रीतीने पाठवावा.

**मा.कार्यकारी संचालक,**

**राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,पुणे,महाराष्ट्र**

**औंध जिल्हा रुग्णालय परिसर,सांगवी फाट्याजवळ,**

**औंध छावणी,औंध, पुणे.४११०२७**

**दूरध्वनी नंबर:- ०२०-२६०५७५०१/२६०५७५१०**

१०. अर्जासोबत पदाशी निगडीत शैक्षणिक अर्हतेची गुणपत्रक तसेच प्रमाणपत्र,अनुभव प्रमाणपत्र,जात प्रमाणपत्र तसेच आवश्यक रकमेचा धनाकर्ष इ.जोडणे आवश्यक आहे.

११. अर्ज व त्यासोबतचे सर्व कागदपत्र लिफाफ्यात बंद करुनच सादर करावी. लिफाफ्यावर अर्ज केलेल्या पदाचे नाव व अर्जदाराचे नाव नमूद करावे.

१२. हस्तदेय अर्ज वरील नमुद पत्त्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार,रविवार व सावर्जनिक सट्टीचे दिवस वगळून) सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या वेळेतच स्वीकारले जातील.

१३. एकापेक्षा अधिक पदांकरिता स्वतंत्र लिफाफ्यात अर्ज सादर करावेत.

१४. सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व/वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.

१५. सदर जाहीरातीच्या अनुषंगाने काही शंका असल्यास ०२०-२६०५७५०१/२६०५७५१० या क्रमांकावर संपर्क करावा.

**सही/**

**सहसंचालक (अतांत्रिक)**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई.**

**प्रतिज्ञापन**

**नमुना अ**

मी श्री./श्रीमती/कुमारी ..............................................................

श्री....................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,...........................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ............................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-